तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
E-mail :dtedesk2a@ dtemaharashtra.gov.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

का.२अ/एडीएम/ २०१८/६९८
दि. 18 MAY 2018

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई /पुणे / नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर

**विषय : प्रवेश शुल्काची रक्कम वसुल करुन घेण्याबाबत...**

संदर्भ : राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे क्र.राज्य सीईटी कक्ष/लेखा/प्रवेश शुल्क/५२३/२०१८, दि.१९/४/२०१८ चे पत्र.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये ७८१ विदयार्थ्याना अतिरीक्त् प्रवेश फेरीद्वारे शासकीय संस्थेमध्ये प्रवेश देण्यात आलेल्या विदयार्थ्यांचे प्रवेश निश्चिती शुल्क प्रवेश घेतलेल्या संस्थेस पाठविणे आवश्यक होते, परंतु सदर ७८१ विदयार्थ्यांपैकी ५९० विदयार्थ्यांचे शुल्क संबंधित संस्थेस वर्ग न करता विदयार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात आले आहे, सबब हे विदयार्थी ज्या संस्थेमध्ये प्रवेशित आहेत त्या संस्थांनी सदर शुल्काची रक्कम सदर विदयार्थ्याकडून वसूल करावी व याबाबत आपले स्तरावर संस्थांना व विदयार्थ्यांना सूचना द्याव्यात असे प्रशासकीय अधिकारी, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांनी संदर्भाधिन पत्रान्वये या संचालनालयास कळविलेले आहे. सुलभ संदर्भासाठी पत्राची प्रत व प्रवेशित ५९० विदयार्थ्यांची यादी सोबत जोडण्यात आली आहे.

वरील बाब विचारात घेऊन आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधिन पत्रासोबत जोडण्यात आलेल्या उमेदवारांच्या यादीतील आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या शासकीय व अनुदानित संस्थेत अतिरीक्त प्रवेश फेरीमध्ये प्रवेशित झालेले विदयार्थी हे आपल्या विभागातील संस्थेमधीलच आहेत याची शहानिशा करुन प्रवेश निश्चिती शुल्क संबंधित विदयार्थ्याकडून वसूल करुन घेण्याबाबतच्या सूचना संबंधित संस्थेस व विदयार्थ्यांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल मा.आयुक्त,राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, बांद्रा (पू.), मुंबई यांना संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने पाठविण्यात यावा व त्याची एक प्रत या संचालनालयास सादर करण्यात यावी.

सहपत्र : वरीलप्रमाणे

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2018/ 1941
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 22 MAY 2018

प्रति.

प्राचार्य,

सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,

नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली प्रवेश शुल्काची रक्कम वसूल करण्याबाबत कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर